शुभ धनत्रयोदशी

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. ६ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ११८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

जनता

आरोप प्रत्यारोपात
लुटत जाते जनता
आपल्याच धुंदीत
दिसायला लागते सत्ता

भावना, समाज सार
व्यवहारातला फंडा
राजकारण म्हणजे
उरला गंभीर धंदा !

SPOT NEWS

हसन मुश्रीफ यांच्या विरोधातील 'ईडी'ची फाईल कायमची बंद

● **मुंबई** – एकीकडे गोकुळ दूध संघातील अध्यक्ष निवडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील मंत्री हसन मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांसाठी एक अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय समोर आला आहे. मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सादर केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारत, मुश्रीफ आणि त्यांच्या मुलांविरोधातील २०२२ चा मनी लॉंड्रिंगची केस अधिकृतपणे बंद केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील मूळ गुन्हे आधीच रद्दबातल ठरवल्यामुळे मनी लॉंड्रिंग कायद्यांतर्गत ही कारवाई पुढे चालवणे शक्य नसल्याचे न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना १० हजार रुपयांचा बोनस जाहीर

● **मुंबई** – महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे.

ऊसदराचा निर्णय ९ नोव्हेंबरपर्यंत घ्या!

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । शेतकरी संघटना आणि कारखाना प्रतिनिधी समवेत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

● **अहिल्यानगर । वीरभूमी** – जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊसदर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत बैठक घेऊन ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कारखान्यांतील वजनकाट्यांची तातडीने तपासणी करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहतील. तसेच शेतकऱ्यांच्या तक्रारींच्या निराकरणासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामातील ऊसदर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक झाली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व मागण्या जाणून घेतल्या.

ऊसदर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. राज्य सहकारी बँकेच्या धोरणानुसार जिल्हा सहकारी बँकेचे धोरण निश्चित होईल. सध्या जिल्हा बँकेवर प्रशासक असल्याने कारखान्यांना मदत करण्याबाबत त्यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यात समन्वय राखून प्रश्न सोडविण्याची शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून सर्व संबंधित घटकांच्या सहकार्याने मार्ग काढण्यात येईल, असेही डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमहापौर धनंजय जाधव, प्रादेशिक उपसंचालक (साखर) संजय गोंदे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



वजनकाट्यांची संयुक्त तपासणी

■ ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कारखान्यांतील वजनकाट्यांच्या अचूकतेबाबत उपस्थित केलेली मागणी मान्य करण्यात आली आहे. त्यानुसार तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक सर्व संबंधित कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी करणार आहे. तपासणी पारदर्शकपणे व्हावी, यासाठी शेतकरी किंवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही पथकासोबत उपस्थित राहतील. त्यामुळे वजन प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होणार आहे.

तक्रार निवारण केंद्राची स्थापना

■ गळीत हंगामादरम्यान ऊस उत्पादक शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी आणि तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी स्वतंत्र तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राधान्याने हाताळून त्यावर योग्य तोडगा काढण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले.

अटक आणि ताब्यात घेणे यांच्यात फरक नाही : सर्वोच्च न्यायालय

● **नवी दिल्ली । वीरभूमी** – राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) नुसार, एखाद्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यासाठीचा २४ तासांचा कालावधी हा केवळ औपचारिक अटकेच्या वेळेपासून नव्हे, तर संबंधित व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या वेळेपासूनच सुरू होईल असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने अटक आणि ताब्यात घेणे यांच्यातील कृत्रिम फरकाबाबत निकाल दिला.

सीमाशुल्क आणि अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत चौघा संशयित आरोपींचा जामीन त्रिपुरा उच्च न्यायालयाने फेटाळला होता. या प्रकरणी २९ सप्टेंबर २०२५ रोजी शोध आणि जप्ती प्रक्रियेदरम्यान त्यांना ताब्यात घेण्यात आले होते, परंतु अधिकृतपणे त्यांना ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अटक केल्याचे दाखवण्यात आले. याविरोधात संशयितांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) नुसार, एखाद्या व्यक्तीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यासाठी विहित केलेली २४ तासांची मुदत ही स्थानबद्धतेच्या काळापासून सुरू होईल. २४ तासांचा कालावधी केवळ अधिकृत अटकेपासून सुरू होतो.

विनापरवाना वायरमनकडून काम; पाथर्डी पालिकेला महावितरणची नोटीस

● **पाथर्डी । वीरभूमी** – पाथर्डी शहरातील पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम करणाऱ्या खासगी ठेकेदाराचे कर्मचारी आवश्यक शासकीय परवान्याशिवाय महावितरणच्या विद्युत वाहिन्यांवर काम करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे कर्मचारी आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन महावितरणच्या पाथर्डी उपविभागाने नगर परिषद प्रशासनाला कडक नोटीस बजावली आहे.

पाथर्डी नगर परिषदेने शहरातील पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम खासगी ठेकेदाराकडे सोपविले आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराकडील वायरमन व तंत्रज्ञांकडे महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून आवश्यक असलेले अधिकृत वायरमन परवाना प्रमाणपत्र नसल्याची तक्रार महावितरणकडे प्राप्त झाली होती. विद्युत सुरक्षेच्या नियमांनुसार आवश्यक पात्रता व परवान्याशिवाय विद्युत वाहिन्या किंवा यंत्रणेवर काम करणे हा गंभीर नियमभंग ठरू शकतो.



या तक्रारीची दखल घेत महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना नोटीस बजावली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे अधिकृत परवाने सात दिवसांत सादर करण्यासह या प्रकरणी लेखी खुलासा देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नोटीस बजावल्यानंतरही विनापरवाना कर्मचारी महावितरणच्या वीजखांबांवर, वितरण रोहित्रांवर (डीपी) किंवा अन्य विद्युत यंत्रणेवर अनधिकृतपणे काम करताना आढळल्यास संबंधित कर्मचारी, ठेकेदार आणि नगर परिषदेच्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध पोलिसांत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महावितरणने दिला आहे.

भविष्यात अशा अनधिकृत कामांमुळे विद्युत अपघात किंवा जीवितहानी झाल्यास त्याची कायदेशीर व आर्थिक जबाबदारी नगर परिषद प्रशासन आणि संबंधित ठेकेदारावर राहील, असेही नोटिशीत स्पष्ट करण्यात आले आहे.

या प्रकारामुळे पथदिव्यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामातील विद्युत सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित या गंभीर प्रकरणात नगर परिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई करते, याकडे पाथर्डीकरांचे लक्ष लागले आहे.

अहिल्यानगरच्या संत-कीर्तनकारांची गोदावरी परिक्रमा पूर्ण

प्रवरासंगम येथे संकल्पपूर्ती पूजा आणि महाप्रसादाने सांगता । ४० संत-कीर्तनकारांचा सहभाग

● **नेवासा । वीरभूमी**- अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख कीर्तनकार आणि संत-साधकांनी हाती घेतलेली श्री गोदावरी मातेची पवित्र परिक्रमा बुधवार, ३ नोव्हेंबर रोजी भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पूर्ण झाली. शनिवार, २३ ऑक्टोबर रोजी प्रवरासंगम येथील ऐतिहासिक सिद्धेश्वर मंदिरात गंगापूजन आणि संकल्प करून या १५ ते २० दिवसांच्या परिक्रमेचा प्रारंभ झाला होता.

अहिल्यानगरच्या वारकरी आणि संत परंपरेतील साधकांनी साधुसंतांच्या आशीर्वादाने व गोदामातेची सेवा घडावी, या उद्देशाने हा संकल्प केला होता. गोणेगाव चौफुला येथील रामकृष्णाश्रमाचे प्रमुख महंत श्री भगवानजी महाराज जंगले शास्त्री यांच्या संकल्पनेतून या परिक्रमेचे आयोजन करण्यात आले होते.

परिक्रमेच्या प्रारंभी गंगापूजन आणि संकल्प करून संतवृंदाने श्रीक्षेत्र देवगड व नेवासा येथे दर्शन घेतले. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करून, गोदावरीचा उगम न ओलांडता उत्तर तटाने बसने प्रवास सुरू केला.

या परिक्रमेत श्रीहरी महाराज वाकचौरे, भगवानजी महाराज जंगले शास्त्री, नंदकिशोर महाराज खरात, श्रीराम महाराज झिंजुर्के, सेवानाथ महाराज खोकर, सुदाम महाराज आदमने, राजेंद्र महाराज आसणे, ब्रह्मानंदगिरी महाराज, रितेश महाराज देशमुख, गहिनीनाथ महाराज आढाव, चांगदेव महाराज काळे, गणेश महाराज आरगडे, हरी महाराज भोगे, रामेश्वर महाराज कंठाळे, विनोद महाराज तपसे, अभेदानंद महाराज बीड, नर्मदानंददास महाराज मध्यप्रदेश, आचार्य भगवानजी महाराज चोळके शास्त्री, विशाल महाराज गिरमे, ऋषिकेश महाराज वाकचौरे, बाळकृष्ण महाराज दिघे, अशोक महाराज बोरुडे, राम महाराज चोपडे, अवधूतपुरी जी महाराज, संदीप महाराज बाजाठाण, ज्ञानेश्वर महाराज भिसे, उद्धव महाराज गोरे, राजाराम बाबा, पांडुरंग महाराज पवार, अर्जुन महाराज तनपुरे, जगदीश दळे मंडपवाले, तुकाराम महाराज पवार, विठ्ठल महाराज बेल्हेकर, देवीदास महाराज घुले, पोपटराव आघाव, आकाश महाराज गायकवाड, गजुभाऊ मुंबईकर आणि दीपकभाऊ वळन यांच्यासह जिल्ह्यातील सुमारे ४० प्रमुख संत आणि कीर्तनकार सहभागी झाले होते.



परिक्रमेच्या प्रवासादरम्यान दररोज पहाटे स्नान, काकडा भजन, नामजप, हरिपाठ, कीर्तन आणि स्वामी ब्रह्मानंदजी यांचे प्रवचन असा भव्य सत्संग सोहळा रंगला. परिक्रमेच्या दरम्यान वैकुंठवासी गुरुवर्य बन्सी महाराज तांबे यांची पुण्यतिथी श्रीक्षेत्र पिठापूर, आंध्र प्रदेश येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सेवानाथ महाराज, स्वामी अवधूत पुरीजी महाराज आणि बाळकृष्ण महाराज दिघे यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आला. यासोबतच भजनभीष्म बोधे बाबा यांचीही पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

ही परिक्रमा त्र्यंबकेश्वरपासून तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील राजमहेंद्री (अंतर्वेदी संगम / पाँडिचेरी) पर्यंत जाऊन दक्षिण तटाने परतीचा प्रवास करत पुन्हा अहिल्यानगर जिल्ह्यात पोहोचली. या उपक्रमातून गोदावरी तटाचे धार्मिक, परमार्थिक आणि ऐतिहासिक महत्त्व तसेच संस्कृती जतन करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. ठिकठिकाणी परिक्रमावासीयांचे भव्य स्वागत झाले. त्याचबरोबर गोदावरी स्वच्छता आणि जलसंवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेशही दृढ झाला. या परिक्रमेची महाराष्ट्रभर चर्चा होत आहे. बुधवार, ३ नोव्हेंबर रोजी प्रवरासंगम येथील सिद्धेश्वर मंदिरासमोर स्वामी अभेदानंदगिरीजी यांच्या हस्ते संकल्पपूर्ती पूजा झाली. रामेश्वर महाराज कंठाळे यांच्यातर्फे महाप्रसाद वाटप करण्यात आले. काल्याच्या महाप्रसादाने परिक्रमेची सांगता झाली.

वीरभूमी

SPOT NEWS

ज्येष्ठ छायाचित्रकार राजू शेख यांचा 'रेडिओ नगर'वर विशेष संवाद!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**



पत्रकारिता क्षेत्रात वृत्तपत्र छायाचित्रकाराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. एखादी घटना शब्दांत मांडण्यापूर्वी ती आपल्या कॅमेऱ्यातून जिवंत करणारा छायाचित्रकार हा पत्रकारितेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतो. अशाच छायाचित्रणाच्या माध्यमातून अनेक वर्षे पत्रकारितेची सेवा करणारे जुन्या पिढीतील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार राजू शेख यांच्याशी 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'च्या विशेष मुलाखतीत मनमोकळा संवाद साधण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'वर प्रसारित होणार आहे. 'लोकशाहीचा चौथा स्तंभ : प्रेस फोटोग्राफर' या विशेष मुलाखतीच्या माध्यमातून राजू शेख यांनी आपल्या प्रदीर्घ जीवनप्रवासातील अनेक अनुभवांना उजाळा दिला. त्यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार अजय धोपावकर यांनी घेऊन त्यांना विविध विषयांवर बोलते केले. वृत्तपत्र छायाचित्रणाची सुरुवात, त्या काळातील आव्हाने, बातमीसाठी घटनास्थळी पोहोचण्याची धडपड, योग्य क्षण टिपण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत आणि छायाचित्रकार म्हणून घडत गेलेला प्रवास अशा विविध विषयांवर त्यांनी आपले अनुभव मांडले. एकेकाळी फिल्म रोल, निगेटिव्ह, डार्करूम आणि छायाचित्र विकसित करण्याच्या प्रक्रियेतून वृत्तपत्र छायाचित्रणाचा प्रवास सुरू होता. एका महत्त्वाच्या क्षणाचे छायाचित्र टिपण्यासाठी छायाचित्रकाराला प्रचंड संयम, निरीक्षणशक्ती आणि प्रसंगावधान राखावे लागत असे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, डिजिटल कॅमेरे, आधुनिक लेन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे छायाचित्रणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या बदलत्या छायाचित्रकलेचा प्रवास आणि जुन्या काळातील अनुभव यांची सांगड घालत राजू शेख यांनी आपले विचार व्यक्त केले. काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले, छायाचित्रणाची साधने बदलली; मात्र बातमीचा अचूक क्षण टिपण्याची दृष्टी, सामाजिक भान आणि छायाचित्रातून वास्तव मांडण्याची जबाबदारी आजही तितकीच महत्त्वाची आहे, या विषयावर त्यांनी संवाद साधला आहे. नव्या पिढीतील छायाचित्रकार आणि पत्रकारांसाठी हा संवाद निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. जुन्या पिढीने अनुभवलेल्या पत्रकारितेच्या आठवणी आणि नव्या पिढीसमोर उभे असलेले आधुनिक तंत्रज्ञानाचे विश्व यांच्यातील दुवा साधणारी ही मुलाखत ठरणार आहे.

तान्हाबाई वाकचौरे यांचे निधन

● **अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील कळस येथील जुन्या पिढीतील तान्हाबाई लक्ष्मण वाकचौरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या कळस येथील चहावाली बाई म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर कळस येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्या माजी सैनिक यादव वाकचौरे, संपत वाकचौरे व शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हा प्रमुख रावसाहेब वाकचौरे यांच्या मातोश्री होत.

महिलांनी तयार केलेली उत्पादने खातेदारांपर्यंत

दिपावलीनिमित्त वृद्धेश्वर मल्टिस्टेटचा अभिनव उपक्रम । महिला उद्योजिका आणि बचत गटांना प्रोत्साहन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**



दीपावलीनिमित्त ग्राहक, खातेदार, सभासद आणि आप्तस्वकीयांना मिठाई किंवा भेटवस्तू देण्याची परंपरा अनेक संस्थांमध्ये आहे. मात्र, वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट या शेतकरी व महिला केंद्रित आर्थिक संस्थेने यंदा महिला सबलीकरण आणि स्थानिक महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी अभिनव उपक्रम राबविला आहे. खाद्योत्सवांतर्गत महिलांनी तयार केलेली विविध उत्पादने खातेदार आणि ग्राहकांना दिवाळी भेट म्हणून पाठविण्यात आली आहेत.

संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठलराव वाडगे, चेअरमन सायली वाडगे, व्हाईस चेअरमन अनिल गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे यांनी यासाठी पुढाकार घेतला.

या उपक्रमाची माहिती देताना मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना वाडगे-गावडे म्हणाल्या की, वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट संस्थेतर्फे दरवर्षी दिवाळीनिमित्त सहकारी, खातेदार आणि हितचिंतकांना कॉर्पोरेट गिफ्टिंग केले जाते. मात्र, यंदा भेटवस्तू देण्यासोबत सामाजिक उद्देशही साध्य व्हावा, या हेतूने स्थानिक महिला उद्योजिका आणि महिला बचत गटांकडून उत्पादने मागविण्यात आली.

यासाठी अनेक महिलांनी विविध उत्पादने सादर केली. त्यापैकी स्नेहल धर्माधिकारी आणि त्यांच्या सहकारी महिलांनी तयार केलेली 'न्याहरी शिदोरी' ही आरोग्यदायी उत्पादने निवडण्यात आली. यात थालीपीठ भाजणी, मूग भजी, मूग डोसा, ढोकळा मिक्स आणि धिरडे मिक्स अशा विविध उत्पादनांचा समावेश आहे.

विविध धान्ये आणि कडधान्यांपासून तयार होणाऱ्या या पदार्थांमुळे आहारात वैविध्य आणण्याचा संदेश देण्यात आला आहे. या उत्पादनांचा वापर करणाऱ्यांना आरोग्यदायी आहाराचा आनंद घेता येईल, असे मेघना वाडगे-गावडे यांनी सांगितले.

महिलांनी मेहनतीने तयार केलेली आणि पारंपरिक खाद्यसंस्कृतीशी जोडलेली ही उत्पादने निवडणे म्हणजे त्यांच्या कष्टांना दिलेली दाद, व्यवसायासाठी उपलब्ध करून दिलेली बाजारपेठ आणि स्वावलंबनासाठी केलेला छोटासा हातभार आहे. अशा छोट्या निर्णयांतून महिला उद्योजिकांना मोठ्या बाजारपेठेशी जोडता येते आणि महिला सबलीकरणाचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविता येतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिला सबलीकरणासोबतच आरोग्यदायी दिवाळीचा संदेश देताना वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटने स्थानिक महिला उद्योजिकांच्या पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देऊन कृतीशील समाजकारण केल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

महिला सबलीकरण हा केवळ भाषणांपुरता मर्यादित विषय नसून दैनंदिन निर्णय आणि कृतीतून प्रत्यक्षात उतरविण्याची गरज आहे. स्थानिक उत्पादक, महिला बचत गट आणि महिला उद्योजिकांच्या कष्टांना सन्मान मिळायला हवा. एका महिलेचा व्यवसाय सक्षम झाला, तर तिच्या कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीसह समाजाच्या विकासालाही हातभार लागतो, असे त्यांनी सांगितले.

महिला उद्योजिकांच्या स्वप्नांना बळ देणारी आणि आरोग्यदायी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देणारी दिवाळी ठरावी, हाच संदेश वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेटच्या या अभिनव उपक्रमातून देण्यात आला आहे.

जिल्हा बँकेच्या चेअरमनपदी मोनिका राजळेंना संधी द्या; ॲड. सुरेश लगड यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

● **पाथर्डी । वीरभूमी –**



अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनपदी आमदार मोनिका राजळे यांची निवड करावी, अशी मागणी ॲड. सुरेश लगड यांच्यासह विविध मान्यवरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. जिल्हा बँकेची निवडणूक पक्षविरहित पद्धतीने होत असल्याच्या पार्श्वभूमीवर महिलांना नेतृत्वाची संधी देण्यासाठी मोनिका राजळे यांना चेअरमनपदाची जबाबदारी द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

आ. मोनिका राजळे या सलग दोन टर्मपासून लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असून, त्यांना प्रदीर्घ राजकीय व प्रशासकीय अनुभव आहे. त्यांची कार्यपद्धती, सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका तसेच निष्कलंक आणि चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्व पाहता त्या जिल्हा बँकेच्या चेअरमनपदासाठी योग्य उमेदवार ठरतील, असा विश्वास निवेदनातून व्यक्त करण्यात आला आहे.

जिल्हा बँकेचे नेतृत्व करताना त्या पक्षीय भेदभाव न करता सर्व संचालकांना विश्वासात घेऊन पारदर्शक, निष्पक्ष आणि सर्वसमावेशक पद्धतीने कामकाज करतील. सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्वोच्च पदावर महिलेला संधी दिल्यास महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने सकारात्मक संदेश जाईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

राजळे या भाजपच्या विद्यमान आमदार असल्या, तरी जिल्हा बँकेचे नेतृत्व पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन सर्वांना सोबत घेणारे असावे, या भूमिकेतून त्यांना चेअरमनपदाची संधी द्यावी, अशी मागणी ॲड. सुरेश लगड, बाळासाहेब केरुनाथ विखे पाटील, ज्ञानदेव पाटील पाडळे (देवगाव, नेवासा), ॲड. आनंद सूर्यवंशी आणि ॲड. रवींद्र रणसिंग आदी मान्यवरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी किराणा वाटप

शांताराम कोकणे यांचा उपक्रम । स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर फुलवले हास्य

● **अकोले । वीरभूमी–**



अकोले नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त किराणा साहित्याचे वाटप करून सेवानिवृत्त मंडलाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते शांताराम कोकणे यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. गेल्या सात वर्षांपासून ते अकोले शहरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त किराणा साहित्य देत आहेत.

दुष्काळी परिस्थितीत नगरपंचायतीचे स्वच्छता कर्मचारी आर्थिक अडचणींचा सामना करत असतात. अकोले शहराच्या स्वच्छतेसाठी हे कर्मचारी पहाटेपासून कार्यरत असतात. समाजातील दुर्लक्षित घटकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम शांताराम कोकणे सामाजिक बांधिलकीतून करत आहेत.

गुरुवारी आठवडे बाजाराच्या दिवशी वसुबारस या दीपावली सणाच्या प्रारंभी अकोले नगरपंचायतीच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प केंद्रात स्वच्छता दूत म्हणून काम करणाऱ्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना किराणा साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी अकोले विकास सोसायटीचे संचालक हेमंत दराडे, ज्येष्ठ पत्रकार अमोल वैद्य आणि शांताराम कोकणे यांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांना किराणा साहित्य वितरित करण्यात आले. श्री. दराडे आणि श्री. वैद्य यांनी कोकणे तात्या यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. समाजातील दुर्लक्षित घटक असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आरोग्य विभागाचे मुकादम विजय कोटकर उपस्थित होते. दिवाळीनिमित्त किराणा साहित्य दिल्याबद्दल स्वच्छता कर्मचाऱ्यांनी शांताराम कोकणे यांचे आभार मानले.

दिवाळीनिमित्त २०० एकल महिलांना फराळ आणि साड्यांचे वाटप

शुभारंभ प्रतिष्ठानचा उपक्रम । २५ कार्यकर्त्यांनी अकोल्यात येऊन माहेरच्या नात्याने साधला संवाद

● **अकोले । वीरभूमी–**

ऐन दुष्काळात दिवाळी सण साजरा करण्याची चिंता असलेल्या एकल महिलांची दिवाळी गोड करण्यासाठी पुणे येथील शुभारंभ प्रतिष्ठानच्या वतीने अकोले तालुक्यातील २०० एकल महिलांना चार किलो फराळ आणि उत्तम दर्जाच्या साड्यांचे वाटप करण्यात आले. बुंदीचे लाडू, शंकरपाळे, चिवडा आणि चकल्या अशा फराळासह साडीची भेट मिळाल्याने एकल महिला भारावून गेल्या.

साऊ एकल महिला समितीच्या वतीने एकल महिलांची दिवाळी गोड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला अकोल्यातील अनेक हितचिंतकांनी मदत केली. क्रांतीदीपचे डॉ. अशोक धिंदळे यांनी शुभारंभ प्रतिष्ठानशी संपर्क साधून मदत उपलब्ध करून दिली. विशेष म्हणजे, केवळ मदत पाठविण्याऐवजी प्रतिष्ठानचे २५ कार्यकर्ते प्रत्यक्ष अकोल्यात आले. त्यांनी एकल महिलांशी माहेरच्या नात्याने संवाद साधत दिवाळीची भेट दिली.

यावेळी शुभारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. राजेश खळदकर, उपाध्यक्ष अनुरुद्र चव्हाण, सचिव प्रताप निकम, निलेश जगदाळे, राहुल कोरडे, अमित चिंधे, कल्पेश वाडकर, क्रांतीदीपचे डॉ. अशोक धिंदळे, सौ. धिंदळे मॅडम आणि प्रतिष्ठानचे २५ कार्यकर्ते उपस्थित होते.

या प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. राजेश खळदकर, सचिव प्रताप निकम आणि कल्पेश वाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. एकल भगिनींच्या दुःखात सहभागी होत, त्यांची दिवाळी आनंदी करण्यासाठी भाऊ म्हणून काही करता आले, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच शुभारंभ प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली.

कार्यक्रमाला पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष भाऊ पाटील नवले, अर्थवेदचे अध्यक्ष प्रा. बबनराव महाले, पत्रकार प्रकाश टाकळकर, राष्ट्रवादी किसान सभेचे अध्यक्ष वसंत मनकर, दूधगंगा पतसंस्थेचे नितीन चासकर, हिंद सेवा मंडळाचे सहाय्यक सचिव योगेश देशमुख, ज्ञानवर्धिनी बालकमंदिराचे अध्यक्ष अमोल वैद्य, मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती नन्नवरे, उमेद अभियानाचे कुंदन कोरडे, खंडूबाबा वाकचौरे, सुनील शेळके, ऋषभ शहा आणि धनंजय जाजू उपस्थित होते.

यावेळी वैशाली राजगुरू, सीमा भागवत, सीमा गजे, भारती चव्हाण आणि सोनाली बोडके यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आयुष्यातील दुःख आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी सुरू असलेली धडपड त्यांनी शब्दांत मांडली. त्यांच्या भावना ऐकून उपस्थित सर्वजण हेलावून गेले. साऊ एकल महिला समिती त्यांच्यासाठी करत असलेल्या कामाबद्दल महिलांनी कृतज्ञता व्यक्त केली.



अकोल्यातील हितचिंतकांनी केलेल्या मदतीतून महिलांना किराणाही देण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गीता आवारी, वर्षा बेळे, रेखा कोटकर, कल्पना सोनुले, उषा चौधरी, लक्ष्मीताई बगाड, संजीवनी गुडेवार, नाजेमा शेख आणि अर्चना घुले यांनी परिश्रम घेतले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर चिंतेत असलेल्या एकल महिलांचा सण आनंददायी करण्यासाठी ही मदत महत्त्वाची ठरल्याची भावना साऊ एकल महिला समितीच्या अकोले तालुका अध्यक्ष प्रतिमा कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

जैन सोशल फेडरेशनच्या दिवाळी फराळ महोत्सवाला नागरिकांचा प्रतिसाद

● अहिल्यानगर । वीरभूमी –

दिवाळी म्हटले की घराघरांत फराळाची लगबग, खरेदीची धावपळ आणि विविध पदार्थ तयार करण्याची तयारी सुरू होते. मात्र, वाढती महागाई, वेळेची कमतरता आणि घरगुती जबाबदाऱ्यांमुळे महिलांसाठी दिवाळीचा फराळ तयार करणे अनेकदा मोठे आव्हान ठरते. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नगरकरांची दिवाळी गोड करणारा जैन सोशल फेडरेशन संचलित भगवान महावीर भवन येथील दिवाळी फराळ महोत्सव नागरिकांच्या पसंतीस उतरला आहे. सलग १४ व्या वर्षी सुरू झालेल्या या महोत्सवाच्या उद्घाटनानंतर फराळ खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी झाली असून, अक्षरश: रांगा लागल्या आहेत. स्टेशन रोडवरील भगवान महावीर भवन येथे आयोजित या महोत्सवात 'ना नफा, ना तोटा' या तत्त्वावर दर्जेदार फराळ माफक दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे. महागाई आणि दुष्काळाचे सावट असतानाही सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत स्वच्छ, आरोग्यदायी वातावरणात तयार केलेला फराळ उपलब्ध करून देण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे. उद्घाटनानंतर नागरिकांनी विविध फराळ पदार्थांच्या खरेदीसाठी दालनात गर्दी केली. या महोत्सवाचे सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांची दिवाळीची धावपळ आणि ताण कमी होण्यास मिळणारी मदत. दिवाळीच्या दिवसांत घराची स्वच्छता, सजावट, पूजा, पाहुण्यांचे स्वागत आणि इतर कामांमध्ये महिलांचा बराच वेळ जातो. त्यातच फराळाचे विविध पदार्थ तयार करण्यासाठी लागणारा वेळ, मेहनत आणि खर्च यांची भर पडते. अशा वेळी तयार फराळ उपलब्ध असल्याने महिलांना मोठा दिलासा मिळत आहे. बुंदीचे लाडू, मसाला शेव, चिवडा, शंकरपाळे, सोनपापडी यांसह विविध प्रकारचे पारंपरिक दिवाळी फराळाचे पदार्थ येथे उपलब्ध आहेत. उच्च प्रतीचा कच्चा माल वापरून स्वच्छतेची विशेष काळजी घेत फराळ तयार करण्यात आला आहे. घरगुती चव, दर्जा आणि माफक दर यांचा समतोल साधल्यामुळे या महोत्सवाला दरवर्षी नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे.

आरटीओ कार्यालयातील कारभारा विरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक

● अहिल्यानगर । वीरभूमी –

अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरू असलेला अनागोंदी कारभार, अनधिकृत एजेंटशाही, चेक पॉईंटवरील बेकायदेशीर वसुली आणि रस्त्यावरील धोकादायक 'जुगाडू' व ओव्हरलोड ऊस वाहतुकीविरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी सगरे यांना निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे समवेत वाहतूक विभागाचे मनोज साळवे, युवा शहराध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ, गौतम निळ, मनोज साळवे, पप्पू चव्हाण, संदीप साळवे, सुरेश पानपाटील आधीसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, आरटीओ कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना थेट सेवा मिळण्याऐवजी अनधिकृत मध्यस्थ व दलालांच्या माध्यमातून जाण्याची सक्ती केली जात असून, यामुळे सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणूक होत आहे तसेच शासनाचे परिपत्रक असतानाही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना ताटकळत राहावे लागते. तसेच रस्ते तपासणी पथकांकडून चेकिंगच्या नावाखाली चेक पॉईंट्सवर वाहने अडवून बेकायदेशीररीत्या रोख वसुली केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्ह्यात कोणतीही सुरक्षा मानके न पाळता आणि अधिकृत पार्सिंग किंवा आरटीओ मान्यता नसताना सर्रास चालणारी बेकायदेशीर 'जुगाडू' आणि क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) ऊस वाहतूक अत्यंत चिंताजनक बनली आहे. यामुळे गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात येत असूनही आरटीओ प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

अकोले शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या!

ग्राहक पंचायतचे नगरपंचायतीला निवेदन । पाणी, स्वच्छता, दिवाबत्ती, बाजारातील वसुली आणि अतिक्रमणांबाबत मागणी

● अकोले । वीरभूमी–



दुष्काळी परिस्थिती आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अकोले शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी, दिवाबत्ती, स्वच्छता, आरोग्य सुविधा, आठवडे बाजार आणि दैनंदिन भाजी मार्केटसह आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्राने केली आहे. यासंदर्भात नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक आणि तालुकाध्यक्ष दत्ता शेनकर यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, दुष्काळी परिस्थिती आणि दिवाळीच्या काळात अकोले शहरातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पूर्ण दाबाने आणि वाया न जाता उपलब्ध करून द्यावे. शहरातील रस्ते, गल्लीबोळ, तुंबलेल्या गटारी आणि नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने पाणी साचते. प्लास्टिक आणि कचरा साचून राहतो. कोल्हार–घोटी राज्य मार्गावरील सार्वजनिक गटारी आणि त्यावरील ढापे तुटलेले आहेत. त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. शहरातील उघड्यावर पडलेला कचरा हटविण्यात यावा.

शहरातील बंद असलेले, पिवळे पडलेले आणि नादुरुस्त दिवे व लॅम्प तातडीने दुरुस्त करावेत. अकोले शहरात होणारे अपघात रोखण्यासाठी कोल्हार–घोटी राज्य मार्गालगत फुटपाथ आणि पादचारी सुविधांवरील अतिक्रमणे तातडीने हटवावीत. पादचाऱ्यांच्या संविधानिक व मूलभूत अधिकारांचे संरक्षण करून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

आठवडे बाजार आणि दैनंदिन भाजी मार्केटमध्ये शेतकरी व व्यापाऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वसुलीचे दर दर्शनी भागात फलकाद्वारे प्रसिद्ध करण्याचे पत्र नगरपंचायतीने अ.न.पं.जा. क्र. १५३/२०२६, दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी दिले होते. मात्र, अद्याप फलक लावण्यात आलेला नसून पठाणी वसुली सुरू असल्याचे म्हटले आहे.

संबंधित ठेकेदाराने शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांची वसुली केल्याचा आरोप करत, यावर अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पाठपुरावा कमी आहे का किंवा आर्थिक तडजोडी झाल्या आहेत का, अशा शंका निवेदनात उपस्थित करण्यात आल्या आहेत.

अकोले शहरातील सार्वजनिक रस्ते आणि चौकांमध्ये बेकायदा होर्डिंग्ज, बॅनर्स व कमानी लावल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, अपघात होतात आणि शहराचे विद्रूपीकरण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. याबाबत उच्च न्यायालयाने २०१७ मध्ये अनेक निर्देश दिले असून, नगरपंचायतीकडून त्यांचे पालन होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सर्वसामान्य नागरिकांकडून पावती फाडली जाते; मात्र राजकीय व्यक्ती आणि त्यांच्या हितचिंतकांना सूट का दिली जाते, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्यामुळे नगरपंचायतीचा महसूल बुडत असल्याचे म्हटले आहे. प्रत्येक होर्डिंग्ज व बॅनरवर आकारलेल्या रकमेचा पावती क्रमांक, लावण्याचा दिनांक आणि काढण्याचा दिनांक नमूद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

अकोले शहरात शासकीय योजनांतर्गत सुरू असलेल्या कामांच्या ठिकाणी अंदाजपत्रक आणि ऑइल पेंटने तयार केलेले माहिती फलक लावावेत. काम सुरू झाल्यापासून ते निर्धारित मुदतीपर्यंत हे फलक कायम ठेवावेत. विकासकामांचा दर्जा आणि गुणवत्ता चांगली असावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरात अलीकडे झालेल्या वृक्षतोडीवर कारवाई करावी. नगरपंचायतीने लावलेल्या वृक्षांची नियमित पाणी देऊन देखभाल व जोपासना करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या सर्व नागरिकांच्या सुख–सुविधांसंदर्भात ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी धनश्री पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली.

निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्राचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, अध्यक्ष दत्ता शेनकर, कार्याध्यक्ष महेश नवले, माधवराव तिटमे, दत्ता ताजणे, राम रुद्रे, रामदास पांडे, भाऊसाहेब आभाळे, वसंतराव बाळसराफ, बाळासाहेब देशमुख, विश्वास देशमुख, ज्ञानेश्वर पुंडे, सुदाम मंडलिक, ड. राम भांगरे, भाऊसाहेब वाकचौरे, पांडुरंग पथवे, रामहारी तिकांडे, कैलास तळेकर, भाऊसाहेब वाळुंज, जालिंदर बोडके, भाऊसाहेब गोर्डे आदींची नावे आहेत.

महिलांना NCMC कार्ड सक्तीपासून ३१ डिसेंबरपर्यंत दिलासा; ७ नोव्हेंबरपासून अट शिथिल

● पारनेर । वीरभूमी –

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) महिला प्रवाशांना सवलतीच्या तिकिटासाठी छउचउ कार्ड अनिवार्य असण्याच्या नियमात महत्त्वपूर्ण शिथिलता दिली आहे. येत्या ७ नोव्हेंबर २०२६पासून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत महिलांसाठी छउचउ कार्डची अट शिथिल करण्यात आली आहे. अशी माहिती पारनेर आगार प्रमुख अमोल कोतकर यांनी दिली आहे.

या कालावधीत महिलांना कार्ड नसतानाही एसटी प्रवासात सवलतीचा लाभ घेता येणार आहे. मात्र, ३१ डिसेंबरपूर्वी सर्व महिला लाभार्थींनी छउचउ कार्डची नोंदणी करून कार्ड प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन महामंडळाने केले आहे.यापूर्वी महामंडळाने १ ऑक्टोबर २०२६ पासून ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना सवलतीचे तिकीट मिळविण्यासाठी छउचउ कार्ड अनिवार्य केले होते. मात्र, महिला लाभार्थ्यांची मोठी संख्या लक्षात घेता आतापर्यंत केवळ १.१० कोटी छउचउ कार्डची नोंदणी अथवा वितरण झाले आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील अनेक महिलांना या योजनेची पुरेशी माहिती नसल्याने त्यांची नोंदणी अपूर्ण राहिल्याचे महामंडळाच्या निदर्शनास आले आहे.या पार्श्वभूमीवर महिलांना दिलासा देण्यासाठी ७ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत कार्ड सक्ती शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

> ३१ डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत सर्व महिला लाभार्थींची १०० टक्के छउचउ कार्ड नोंदणी व वितरण पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने ठेवले आहे. त्यामुळे महिलांनी या सवलतीच्या कालावधीचा लाभ घेत लवकरात लवकर छउचउ कार्ड काढून घ्यावे.
>
> **– अमोल कोतकर,**
> पारनेर आगारप्रमुख

श्रीकृष्ण गोशाळेत वसुबारस उत्साहात साजरी

● पाथर्डी । वीरभूमी–



दीपोत्सवातील पहिला दिवस असलेल्या वसुबारसचा सण पाथर्डी तालुक्यातील शिरापूरजवळील करडवाडी परिसरात असलेल्या श्रीकृष्ण गोशाळेत मोठ्या भक्तिभावाने आणि पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त गोमाता व तिच्या वासराचे पारंपरिक पद्धतीने विधिवत पूजन करून गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. गोमातेचे पूजन, आरती आणि धार्मिक वातावरणामुळे गोशाळेत भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी करडवाडी येथील गोभक्त किरण गर्जे, तिसगाव येथील गोभक्त मनोज सुंदेचा मुथ्था, गोसेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तथा श्रीकृष्ण गोशाळेचे संस्थापक संचालक हभप दीपक महाराज काळे, काळे कुटुंबीय तसेच गोसेवक उपस्थित होते.

यावेळी बोलताना हभप दीपक महाराज काळे म्हणाले की, पाथर्डी तालुक्यातील सर्वांत मोठ्या गोशाळांपैकी एक असलेल्या श्रीकृष्ण गोशाळेत सध्या सहाशेहून अधिक गोमाता व गोवंशाचे संगोपन केले जात आहे. यामध्ये बहुतांश गोमाता आणि वासरांना कत्तलखान्यात जाण्यापासून वाचवून तसेच कसायाच्या तावडीतून मुक्त करून गोशाळेत आश्रय देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, कसायाच्या तावडीतून मुक्त करण्यात आलेल्या गोमातेला झालेल्या वासराचे वसुबारसेच्या शुभमुहूर्तावर विधिवत पूजन करण्यात आले. गोमातेच्या सेवेतून मिळणारे समाधान आणि तिच्या संवर्धनाचे महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित झाले.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे गोशाळेतील गोवंशाच्या चारा, पाणी व संगोपनाचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. त्यामुळे गोभक्तांनी केवळ धार्मिक परंपरेपुरते गोमातेचे पूजन न करता सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून गोशाळेतील गोवंशाच्या संगोपनासाठी पुढाकार घ्यावा. गोसेवेसाठी शक्य ते सहकार्य करून या कार्यात हातभार लावावा, असे आवाहनही हभप दीपक महाराज काळे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील बहुचर्चित शेअर बाजार

फसवणूक प्रकरणात आरोपींना उच्च न्यायालयाचा दणका!

आरोपी चंद्रकला कवडे, कल्याण कवडे व महेंद्र कवडे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळाला । १ कोटी ६१ लाखांच्या फसवणूक प्रकरणाला महत्त्वपूर्ण वळण

● शेवगाव । वीरभूमी–

शेवगाव तालुक्यातील बहुचर्चित शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी चंद्रकला कवडे, कल्याण कवडे आणि महेंद्र कवडे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे. त्यामुळे आरोपींना मोठा धक्का बसला आहे.

शेवगाव येथील रहिवासी आणि या प्रकरणातील मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी मुख्य आरोपी साईनाथ कल्याण कवडे तसेच सहआरोपी चंद्रकला कवडे, कल्याण कवडे आणि महेंद्र कवडे यांच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. फिर्यादी आणि इतर गुंतवणूकदारांची मिळून तब्बल १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या आरोपानुसार, आरोपी साईनाथ कवडे याने 'सिटिक सोल्युशन्स' या शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर १२ टक्के परतावा देण्याचे आश्वासन देऊन फिर्यादी आणि इतर गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर अनेक गुंतवणूकदारांनी आरोपींकडे मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक केली. मात्र, आश्वासनानुसार परतावा न देता तसेच गुंतवणूकदारांची मूळ रक्कमही परत न केल्याने आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रार फिर्यादी आणि अन्य गुंतवणूकदारांनी केली.



या प्रकरणी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहितेतील संबंधित कलमांसह लागू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी अहिल्यानगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. फिर्यादीच्या वकिलांनी केलेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला. फिर्यादीच्या वतीने ॲड. पंकज खराडे यांनी न्यायालयात ठामपणे बाजू मांडली होती.

त्यानंतर आरोपींनी अटकपूर्व जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अर्ज दाखल केला. येथेही फिर्यादीच्या वतीने ॲड. प्रशांत गिरी यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. मात्र, आरोपींना उच्च न्यायालयातही दिलासा मिळाला नाही.

सदर याचिकेची सुनावणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्यासमोर झाली. मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी ॲड. प्रशांत गिरी यांच्यामार्फत आरोपींना जामीन मंजूर करू नये, यासाठी जोरदार विरोध केला.

प्रकरणातील युक्तिवाद आणि जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून आरोपींना कोणताही दिलासा देण्यास नकार दिला.

या खटल्यात मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांच्यावतीने ॲड. प्रशांत गिरी यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना ॲड. योगेश कासोद यांनी मोलाचे सहकार्य केले. आरोपींना जामीन मंजूर करू नये, यासाठी उच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद करण्यात आला.

उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्याने शेवगावातील या बहुचर्चित शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे. जिल्हा व सत्र न्यायालयानंतर उच्च न्यायालयानेही आरोपींना दिलासा न दिल्याने या प्रकरणाकडे शेवगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे फिर्यादी अवधूत केदार आणि अन्य गुंतवणूकदारांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, या प्रकरणातील पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वीरभूमी

श्रद्धा, सबुरी आणि एकजुटीने शिर्डी संस्थानच्या ४८८ कामगारांचा संघर्ष यशस्वी!

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । मंत्रालय स्तरावर केलेल्या पाठपुराव्याबद्दल विखे यांचा नागरी सत्कार

● **शिर्डी । वीरभूमी –**

कामगारांनी श्रद्धा आणि सबुरीने केलेल्या संघर्षाला मोठे यश मिळाले असून, विश्वासाने दाखवलेल्या एकजुटीमुळे आनंदाचा क्षण तुमच्या सर्वांच्या जीवनात आला आहे. या यशात अनेकांचे योगदान आहे. मात्र, आता वाढलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवा, असा सल्ला जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

शिर्डी संस्थानमधील ४८८ कामगारांना सेवेत कायम करण्यासंदर्भात न्यायालयाने महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय दिला. मंत्रालय स्तरावर मंत्री विखे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कामगार संघटनेच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुकाराम हुलवळे, शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपनगराध्यक्ष अभय शेळके, कामगारांच्या पतपेढीचे चेअरमन विठ्ठलराव पवार यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील यांनी कामगारांच्या वीस वर्षांच्या लढ्याचा उल्लेख केला. सर्व कामगार विश्वासाने एकत्र राहिले, हे महत्त्वाचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय सकारात्मक भूमिका घेतल्यामुळे हे साध्य होऊ शकले. अनेकांनी बुद्धिभेद निर्माण करण्याचा प्रयत्न केला; मात्र श्रद्धा आणि सबुरीच्या मंत्राने तुम्ही यश मिळविले, असे त्यांनी सांगितले.

यापूर्वी १,०५२ कामगारांच्या सेवेत कायम करण्याचा निर्णय घेताना तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांनी मोठे धाडस दाखविले. स्व. जयंतराव ससाणे आणि मी पाठपुरावा केला, तेव्हा पहिला निर्णय होऊ शकला. त्यावेळीही अनेकजण देव पाण्यात घालून बसले होते. मात्र, जिथे मनात काम करण्याची प्रामाणिक भावना असते, तिथे साईबाबा पाठीशी उभे राहतात, असे मंत्री विखे पाटील म्हणाले.

शिर्डीसाठी कोणताही निर्णय घेताना स्वार्थ कधी मनाला शिवला नाही. तसा संस्कार वाडवडिलांनी केला नाही. सामाजिक बांधिलकीने काम करत राहिलो, म्हणून अनेक वर्षे या भागाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत गेली. दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करायची; मात्र जनतेशी प्रतारणा करायची नाही, हीच भूमिका कामगारांच्या लढ्यातही ठेवली, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

कामगारांची जबाबदारी आता वाढली आहे. येणाऱ्या भाविकांचे तुम्ही स्वागत कसे करता, यावर शिर्डीचा नावलौकिक अधिक वाढणार आहे. देशात अनेक आध्यात्मिक क्षेत्रे विकसित झाली आहेत. भाविक आपल्या श्रद्धेनुसार विविध ठिकाणी जात असतात. त्यामुळे शिर्डीत चांगले वातावरण, सुरक्षा आणि स्वच्छता राखण्याचे आव्हान तुम्हाला स्वीकारावे लागणार आहे.

शिर्डी परिसराचा विकास चांगल्या



पद्धतीने होत असून, विमानतळ आणि बाह्यवळण रस्ता करताना अनेक अडचणी आल्या. टीकाही झाली; मात्र त्याचे महत्त्व आज सर्वांना समजले आहे. निळवंडेचे पाणी आल्यामुळे दुष्काळातही दिलासा देता आला. अन्य ठिकाणी परिस्थिती भयानक असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या भाषणात अनेक वर्षांच्या आरोपांना आणि टीकेला आता पूर्णविराम मिळाला असून, शब्दपूर्तीचा आजचा दिवस असल्याचे सांगितले. केवळ जनतेचे प्रेम विखे परिवाराला मिळते, त्याची उतराई करण्याचे काम आम्ही करतो. ना. विखे पाटील यांच्यावर विश्वास ठेवला, त्याचे फळ आज कामगारांना मिळाले आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि विठ्ठलराव पवार यांचीही भाषणे झाली.

घाटाखालचीवाडी शाळेला ब्लूटूथ स्पीकर, कलर प्रिंटर आणि सोलर पॅनल भेट

● **अकोले । वीरभूमी–**



'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, घाटाखालचीवाडी, समशेरपूर येथे शैक्षणिक प्रगतीसाठी विविध शालेय उपयोगी साहित्य भेट देण्यात आले. समाजाप्रती आपले योगदान असावे, या भावनेतून दानशूर व्यक्तींनी शाळेला मदत केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य संजय गोरे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून समशेरपूर केंद्राचे केंद्रप्रमुख दीपक बोऱ्हाडे उपस्थित होते.

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या 'मिशन आपुलकी' उपक्रमातून आपण शाळेचे आणि समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून नितीन कैलास टिळेकर (सॉफ्टवेअर इंजिनिअर, जर्मनी) यांनी आपल्या लाडक्या लेकी नूर्वीच्या वाढदिवसानिमित्त 'इरीं' या नामांकित कंपनीचा १६० किलोवॉटचा ब्लूटूथ स्पीकर भेट दिला.

तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे विद्यमान अध्यक्ष अमोल पंढरी दराडे, निलेश उगले आणि स्वर्गीय वसंत नाना दराडे यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ सागर वसंत दराडे व अजित सुधाकर पवार यांनी शाळेला कलर प्रिंटर भेट दिला. ग्रामपंचायत समशेरपूरचे सरपंच एकनाथ मेंगाळ यांच्या विशेष प्रयत्नांतून शाळेला ऑन-ग्रीड सोलर पॅनल उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे शाळेची विजेची समस्या कायमस्वरूपी दूर झाली आहे.

या सर्वांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. समाजातील दानशूर व्यक्तींचा पुढाकार आणि शिक्षणाप्रती असलेली तळमळ कौतुकास्पद असल्याचे मत प्रमुख पाहुणे दीपक बोऱ्हाडे यांनी व्यक्त केले.

आगामी काळात इतरही प्रलंबित भौतिक सुविधा आजी-माजी पालकांच्या सहकार्यातून पूर्ण करण्यात येतील, असे अध्यक्ष संजय गोरे यांनी सांगितले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सतीश साळवे यांनी मनोगत व्यक्त केले.

माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष शंकरभाऊ चोखंडे यांनीही शाळेच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेच्या विकासासाठी हातभार लावण्याचे आश्वासन दिले.

शाळेचे विद्यमान सदस्य राजू भरीतकर यांनी शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्या संयुक्त विद्यमाने सर्व देणगीदार पालकांचा यथोचित सत्कार केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोर्डे सर यांनी केले, तर शाळेच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व दानशूर व्यक्ती, पालक आणि सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मुख्याध्यापिका श्रीमती जोंधळे यांनी मानले.

कुकडीच्या आवर्तनातून पिण्यासाठीचे जलस्रोतही भरा!

दुहेरी गळती टाळण्यासाठी घनश्याम शेलार यांची जलसंपदामंत्र्यांकडे मागणी

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**



कुकडी डाव्या कालव्याचे ५ नोव्हेंबरपासून शेतीसाठी आवर्तन सुरू होत आहे. या आवर्तनातून केवळ उभ्या पिकांना पाणी देण्याऐवजी पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असलेले जलस्रोतही भरून घेण्यात यावेत, अशी मागणी घनश्याम प्रतापराव शेलार यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कुकडी डाव्या कालव्याच्या शून्य ते २४९ किलोमीटर अंतरादरम्यान पाणी वाहून नेताना मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होते. हा आजवरचा अनुभव आहे. सध्याच्या आवर्तनात केवळ शेतीसाठी पाणी सोडल्यास गळतीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याचे जलस्रोत कोरडे पडले असून काही स्रोत लवकरच कोरडे पडण्याची भीती आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी भविष्यात स्वतंत्र आवर्तन सोडण्याची वेळ आल्यास पुन्हा एकदा कालव्यातून पाणी वाहून नेताना मोठ्या प्रमाणात गळती होईल. त्यामुळे एकाच पाण्यासाठी दोनदा होणारा अपव्यय टाळण्यासाठी सध्या सुरू असलेल्या आवर्तनातच पिण्याच्या पाण्याचे जलस्रोत भरून घेणे आवश्यक आहे, असे शेलार यांनी निवेदनात म्हटले आहे.

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता शेतकऱ्यांची उभी पिके वाचविण्याबरोबरच नागरिकांचे पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठीच्या चाऱ्याचेही योग्य नियोजन होणे गरजेचे आहे. उपलब्ध पाण्याचा थेंब न् थेंब उपयोगात आणण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने तातडीने निर्णय घ्यावा आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता तसेच कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक दोनच्या कार्यकारी अभियंत्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

कोतूळ येथील वरदविनायक देवस्थानात वसुबारस गोपूजन उत्साहात



● **अकोले । वीरभूमी–**

दीपावलीचा मंगलमय प्रारंभ मानल्या जाणाऱ्या गोवत्स द्वादशी अर्थात वसुबारस या पवित्र पर्वानिमित्त श्री वरदविनायक देवस्थान, कोतूळ येथे गोपूजन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

भारतीय संस्कृतीमध्ये गोमातेला अत्यंत पवित्र आणि पूजनीय स्थान आहे. गोमातेच्या पूजनातून कृतज्ञता, श्रद्धा, निसर्गप्रेम आणि भारतीय संस्कृतीतील कृषीपरंपरेचे महत्त्व अधोरेखित होते. वसुबारसेनिमित्त गोमातेचे विधिवत पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी उपस्थित भाविकांनी गोमातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

गोमाता ही भारतीय संस्कृती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकरी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गोसेवा, गोसंवर्धन आणि गोमातेचे रक्षण ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

दीपावलीच्या पहिल्या मंगलमय पर्वाची गोमातेच्या पूजनाने सुरुवात झाल्याने देवस्थान परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी देवस्थानच्या वतीने अध्यक्ष प्रदीप भाटे यांच्या हस्ते गोपालक शाहीर कैलास अटक यांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यास कोतूळ सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय दुटे, रमेश देशमुख, अनिल देशमुख, विनय समुद्र, कुलदीप नेवासकर, अजित आरोटे, सुभाष घाटकर, सागर सोनुले, अविनाश गीते, वृषाली समुद्र, प्रज्ञा भाटे, प्रियंका पाटील, विद्या परशुरामी, वर्षा नेवासकर, सविता घाटकर, कमल पोखरकर, मेधा देशमुख, पूनम महाजन यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भविष्यात जागतिक स्तरावरील गरजूंना भारतीय नोकऱ्यांचे आकर्षण वाढेल

सतीश गुगळे यांचे मत । श्री तिलोक जैन विद्यालयात मेक्सिको देशातील विद्यार्थ्यांचे स्वागत

● **पाथर्डी । वीरभूमी–**

जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रांत बदलाचा वेग वाढला असून, ज्ञान आणि माहिती मिळविण्याची भूक वाढत आहे. भारतीय तरुणांना सध्या परदेशातील नोकऱ्यांचे आकर्षण आहे. मात्र, भविष्यात जगातील गरजू व्यक्तींना भारतीय नोकऱ्यांचे आकर्षण वाढेल, असे मत श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे यांनी व्यक्त केले.

शैक्षणिक व सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमांतर्गत गेल्या सात वर्षांपासून विविध देशांतील विद्यार्थी श्री तिलोक जैन विद्यालयात अभ्यास दौऱ्यासाठी येत आहेत. यंदा मेक्सिको येथील विद्यापीठाचे तीन विद्यार्थी, दोन विद्यार्थिनी आणि एक शिक्षिका असे सहा जणांचे शिष्टमंडळ दाखल झाले आहे. विद्यालयाच्या पटांगणात त्यांचे शानदार स्वागत करण्यात आले. मेक्सिकोचे विद्यार्थी रेनाटा आणि लन यांचे अस्सल महाराष्ट्रीय पद्धतीने स्वागत झाल्याने ते आणि स्थानिक विद्यार्थी भारावून गेले.

यावेळी प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य भारत गाडेकर, पर्यवेक्षक बाळासाहेब गांगुर्डे, सुधाकर सातपुते, इंग्लिश स्कूलचे प्राचार्य विजय तागड, संस्थेचे पदाधिकारी डॉ. ललित गुगळे, सुरेश कुचेरिया, राजेंद्र मुथा, प्रीतम बाबर, सुरज बाबर आदी मान्यवर उपस्थित होते.



जैन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेक्सिकोच्या विद्यार्थ्यांसोबत रसायनशास्त्र आणि पर्यावरणविषयक अभ्यास करून संयुक्त प्रकल्प तयार केले आहेत. या प्रकल्पांचे सादरीकरणही होणार आहे. पाच दिवसांच्या या शैक्षणिक दौऱ्यात मेक्सिकोचे विद्यार्थी प्रमुख देवस्थानांना भेटी देणार असून, ऐतिहासिक व नैसर्गिक क्षेत्रांचा अभ्यास करणार आहेत. तसेच भारतीय कुटुंबव्यवस्था, दैनंदिन आहार आणि जीवनशैलीचे निरीक्षण करणार आहेत.

यावेळी डॉ. ललित गुगळे म्हणाले की, भारताचे आठ हजार नागरिक मेक्सिकोमध्ये उद्योग-व्यवसायात कार्यरत आहेत. मिरची, बटाटे आणि गहू यांसारखी पिके मेक्सिकोतून भारतात आली आहेत. आज ही पिके भारतीय वाटत असली, तरी त्यांचे मूळ मेक्सिकन आहे. दोन्ही देशांची खाद्यसंस्कृतीही बऱ्याच अंशी सारखी आहे.

दोन्ही देशांतील विद्यार्थी संशोधन, अभ्यास आणि नावीन्याचा शोध संयुक्तपणे घेत आहेत. सांस्कृतिक, शैक्षणिक आणि भावनिक जवळीक दोन्ही देशांच्या प्रगतीची नवी दालने खुली करू शकते. भारतीय विद्यार्थ्यांची जागतिक स्तरावरील प्रतिमा आणि बुद्ध्यांक उंचावण्यासाठी अशा कार्यक्रमांचा महत्त्वपूर्ण सहभाग असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य समन्वयक प्रा. डॉ. श्रीकांत काळोखे यांनी केले. सूत्रसंचालन सुनील कटारिया, वेदिका देवढे आणि अक्षया गुंजाळ यांनी केले, तर अनिल पानखडे यांनी आभार मानले.

स्वागत समारंभानंतर विविध गुणदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे, विद्यार्थी आणि मान्यवरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.